# Sem V Course XI, History of –
# 2.3 J. S. Mill – View of Economic Development
## जे. एस. मिल यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत

**प्रास्ताविक :–**

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञामध्ये ॲडम स्मिथ, रिकार्डो, थॉमस माल्थस आणि जे. एस. मिल यांचा समावेश होतो. जे. एस. मिल ( John Stuart Mill – जॉन स्टुअर्ट मिल) हे एक प्रमुख सनातनवादी विचारवंत होते. इतिहास आणि अर्थशास्त्र विषयाचे गाढे अभ्यासक जेम्स मिल यांचे जॉन स्टुअर्ट मिल हे मोठे चिरंजीव होते. जे.एस.मिल हे लहानपणापासूनच खूप हुषार आणि बुद्धिमान होते. वयाच्या तिसऱ्या वर्षी ते ग्रीक भाषा शिकले होते. वयाच्या सहाव्या वर्षी गणित आणि इतिहास या विषयांचा त्यांनी अभ्यास केला होता. वयाच्या आठव्या वर्षी ते लॅटिन भाषा शिकले हाते. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी तर्कशास्त्राचा अभ्यास केला होता. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला होता. वयाच्या १५ व्या वर्षी त्यांनी राजकीय तत्वज्ञानाचा अभ्यास केला होता. जॉन स्टुअर्ट मिल यांचे सर्व शिक्षण आणि वाचन त्यांचे वडील जेम्स मिल (James Mill) यांच्या मार्गदर्शनाखाली घरीच झाले होते. प्रमुख सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ डेव्हिड रिकार्डो हे जेम्स मिल यांचे जवळचे मित्र होते. त्यामुळे रिकार्डो यांच्या विचारांचा प्रभाव जे. एस. मिल यांच्यावर पडलेला होता. मिल यांनी रिकार्डो यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करून त्यांच्या विवेचनात काही सुधारणा केल्या असून काही नवीन विचारांची भर त्यात घातली आहे. सन १८४८ मध्ये जे. एम. मिल यांनी 'राजकीय अर्थशास्त्राची तत्त्वे' (Principles of Political Economy) हा आपला पहिला ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या काळात हा ग्रंथ खूपच गाजला होता. जे. एस. मिल यांनी आपल्या हयातीत या ग्रंथाच्या सात आवृत्त्या निधालेल्या पाहिल्या. इंग्लंड आणि अमेरिकेतील विविध विद्यापीठांनी त्यांचे हे पुस्तक अभ्यासासाठी लावलेले होते. जवळजवळ पन्नास वर्षे हे पुस्तक दोन्ही देशात शिकवले व अभ्यासले जात होते.

**मिल यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतातील प्रमुख घटक**

जे. एस. मिल यांनी आर्थिक विकासाचा स्वतंत्र असा सिद्धांत मांडला नसला तरी त्यांनी राष्ट्राच्या आर्थिक विकाससंदर्भात जे विविध आर्थिक विचार मांडले आहेत, त्यांची एकत्रित मांडणी करून त्यावरून त्यांचा आर्थिक विकासाबाबतचा दृष्टिकोन समजून येतो. जे. एस. मिल यांनी उत्पादन घटकाबाबत, लोकसंख्येच्या प्रश्नाबाबत, वेतन निधी, भांडवल, संचय, नफा, सरकारची विकासातील भूमिका इत्यादी बाबत जे विचार मांडले आहेत ते आर्थिक विकासाशी संबंधित आहेत. जे. एस. मिल. यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतातील हे प्रमुख घटक मानता येतील. या घटकांची थोडक्यात चर्चा खालीलप्रमाणे केली आहे.

**(१) भूमी, श्रम, भांडवल हे आर्थिक विकास निश्चित करणारे महत्वाचे घटक**

जे. एस. मिल यांनी आपल्या अर्थशास्त्रावरील ग्रंथात आर्थिक विकासावर परिणाम करणाऱ्या उत्पादन घटकांचे विवेचन केले आहे. त्यांनी आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत भूमी, श्रम, भांडवल हे महत्त्वाचे उत्पादन घटक असतात असे म्हटले आहे. According to J.S.Mill, "Economic Development is a Function of Land, Labour and Capital." याचा अर्थ 'राष्ट्राचा आर्थिक विकास हा भूमी, श्रम आणि भांडवल या घटकांचे फलन आहे' म्हणजे भूमी, श्रम आणि भांडवल या उत्पादन घटकांचा आणि आर्थिक विकासाचा जवळचा संबंध

असतो. देशाचा आर्थिक विकास हा या तीन उत्पादन घटकावर अवलंबून असतो. मिल यांचा हा विचार आपणास खालील सूत्राच्या साहाय्याने मांडता येईल.

$$D = f ( La , L, C )$$

Development is the function of Land, Labour and Capital

D = Development (विकास)

f = functional relationship (कार्यात्मक संबंध)

La = Land (भूमी)

L = Labour (श्रम)

C = Capital (भांडवल)

जे. एस. मिल यांनी उत्पादनाच्या भूमी, श्रम आणि भांडवल या तीन घटकापैकी भूमी आणि श्रम हे उत्पादनाचे दोन महत्त्वाचे मूलभूत (Original) घटक आहेत असे म्हटले आहे. त्यांच्या मते 'भांडवल हा पूर्वीच्या (अगोदरच्या) कामगारांनी साठवलेल्या उत्पादनाचा साठा असतो.' ( Capital is a stock previously accumulated of the product of former labour.) संपत्तीत केंव्हा व कशी वाढ होते? या प्रश्नाचे उत्तर मिल यांनी दिले आहे. ते म्हणतात, 'श्रमशक्तीपेक्षा (labour force) भूमी आणि भांडवल हे उत्पादनाचे घटक उत्पादन वाढीस अधिक मदत करतील तेंव्हाच संपत्तीत वाढ होणे शक्य असते.' मिल यांनी संपत्तीमध्ये उपकरणे किंवा अवजारे (tools) यंत्रे (machines) आणि कामगारांचे कौशल्य (Skill of labour force) या घटकांचा समावेश केला आहे. त्यांनी श्रमाचे उत्पादक श्रम (Productive labour) आणि अनुत्पादक श्रम (unproductive labour) असे दोन प्रकार सांगितले आहेत. त्यांनी या दोन्ही श्रमामध्ये फरक असतो असे म्हटले आहे. उत्पादक श्रम हे उत्पादक संपत्ती आणि भांडवल संचय असतात. भांडवल संचयाचा दर हे श्रमदलाचा जो भाग उत्पादक कार्यात गुंतलेला असतो त्याचे फलन असते. (The rate of capital accumulations is a fuction of the Proportion of the labour force employed Productively) अनुत्पादक श्रमामुळे संपत्ती (wealth) किंवा उत्पन्न (income) निर्माण होत किंवा नाही. उत्पादक श्रमामुळेच फक्त संपत्ती आणि भांडवल निर्मिती शक्य होते. जे. एस. मिल यांनी ज्याप्रमाणे उत्पादक श्रम आणि अनुत्पादक श्रम यामध्ये फरक केला आहे त्याप्रमाणे त्यांनी उत्पादक उपभोग आणि अनुत्पादक उपभोग असा फरक केला आहे. उत्पादक उपभोग कशाला म्हणतात आणि अनुत्पादक उपभोग कशाला म्हणतात ते त्यांनी स्पष्ट केले आहे. सर्व प्रकारचा उपभोग हा उत्पादक उपभोग नसतो. उत्पादक श्रमिकांकडून उत्पादक उपभोग घेतला जातो. समाजाची उत्पादक शक्ती वाढवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी घेतला जाणारा उपभोग म्हणजे उत्पादक उपभोग होय. केवळ उत्पादक उपभोग हे उत्पादक श्रम असतात. कामगारांकडून उपभोगल्या जाणाऱ्या निर्वाह वस्तूंचा उपभोग हो उत्पादक उपभोग असतो तर आरामदायी वस्तूंचा उपभोग हा अनुत्पादक उपभोग असतो. अनुत्पादक अनुवादक उपभोगापेक्षा उत्पादक उपभोग हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे असे मिल यांनी म्हटले आहे. अशा प्रकारे उत्पादनाच्या कार्यात 'श्रम' हा महत्त्वाचा घटक असतो असे मिल यांनी म्हटले आहे. त्यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात उत्पादन, उपभोग, विनिमय आणि वितरण या महत्त्वाच्या चार प्रश्नांची चर्चा केली आहे.

## (२) लोकसंख्या नियंत्रण (Control of Population Growth)

जे.एस.मिल यांना थॉमस माल्थस यांचा लोकसंख्या सिद्धांत मान्य होता. त्यांचा माल्थस यांच्या सिद्धांतावर विश्वास होता. लोकसंख्या आणि आर्थिक विकास या दोन घटकात जवळचे संबंध असतात असे त्यांनी म्हटले आहे. लोकसंख्या वाढ ही आर्थिक विकासाशी संबंधित बाब आहे. उत्पादन साधनातील वाढीपेक्षा लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असतो. अप्रगत देशात जलद लोकसंख्या वाढ ही अन्नटंचाईची समस्या निर्माण करते. त्यांनी आपल्या सिद्धांतात उत्पादक लोकसंख्येचा (कार्यकारी लोकसंख्येचा – Working population) विचार केला आहे. उत्पादनाच्या प्रक्रियेत भाग घेत असलेल्या लोकसंख्येचाच विचार मिल यांनी लोकसंख्या संकल्पनेत केला आहे. लोकांच्या हालाखीला लोकसंख्या वाढ हा घटक कारणीभूत आहे असे मिल यांनी म्हटले आहे. लोकांच्या हालअपेष्टा कमी करण्यासाठी लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले पाहिजे. लोकसंख्या वाढ कमी करण्यासाठी उपाय योजले नाहीत तर लोकांची आर्थिक परिस्थिती खालावेल असे मिल यांनी म्हटले आहे. देशाची लोकसंख्या का वाढते? ते सुद्धा मिल यांनी सांगितले आहे ते म्हणतात, लोकांच्यात दूरदृष्टीचा अभाव असल्याने आणि लोकसंख्या वाढीचा वेग रोखण्यासाठी योग्य व निश्चित उपाय न योजल्याने देशाची लोकसंख्या वेगाने वाढते. लोक दूरदृष्टीचे नसल्यामुळे आपली संख्या वाढवत नेतात असे मिल यांनी म्हटले आहे. उत्पादक (कार्यकारी) लोकांच्या (कामगारांच्या) स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. मगच तांत्रिक प्रगतीचे आणि भांडवल संचयाचे फायदे मिळतील. अशा प्रकारे आर्थिक विकासासाठी जन्म दर (Birth rate) कमी केला पाहिजे असा विचार मिल यांनी मांडला आहे. त्यांचा हा विचार थॉमस माल्थस यांच्या विचारांशी मिळता जुळता आहे.

## (३) वेतन निधी (Wage Fund)

कामगारांना वेतन देण्यासाठी वेतननिधी निर्माण केला जातो. हा वेतन निधी भांडवलाचा काही भाग बाजूला काढून तयार केला जातो. कामागारांचे वेतन हा अत्यंत महत्त्वाचा विषय असतो. वेतननिधीवर वेतनाचा दर अवलंबून असतो. वेतननिधी भागिले कामगार संख्या बरोबर वेतन दर होय. वेतनदाराचे सूत्र खालीलप्रमाणे दिले आहे.

$$\text{वेतन दर} = \frac{\text{वेतन निधी}}{\text{कामगारांची संख्या}}$$

वेतन निधीला कामगारांच्या संख्येने भागले असता वेतन दर किंवा मजुरीचा दर प्राप्त होतो. वेतन निधी स्थिर असताना कामगारांची संख्या वाढली तर कामगारांचे वेतनाचे दर कमी होतात. आणि वेतननिधी स्थिर असताना कामगारांची संख्या घटली तर वेतनाचे दर वाढतात. वेतननिधीत वाढ झाली तर वेतनाचा दर वाढतो. आणि वेतननिधीत घट झाली तर वेतनाचा दर घटतो. म्हणून वेतन दराच्या निश्चितीमध्ये वेतन निधी हा घटक महत्त्वाचा आहे. कामगारांच्या वेतनात वाढ करण्यासाठी दोन मार्ग आहेत. (१) वेतननिधीत वाढ केली पाहिजे किंवा (२) कामगार संख्येत घट केली पाहिजे. कामगारांचे वेतन वाढले तर लोकसंख्या वाढून कामगारांचा पुरवठा वाढतो. कामगारांचा पुरवठा वाढला की वेतनाचे दर कमी होतात. तसेच कामगार बेरोजगार होतात. जर देशाची लोकसंख्या स्थिर राहिली आणि वेतन निधीत वाढ

झाली तर कामगारांच्या वेतनात वाढ घडून येईल पण लोकसंख्या स्थिर राहणे ही कठीण गोष्ट आहे. वेतन निधी स्थिर (कायम) असेल आणि लोकसंख्येत वाढ घडून आली तर कामगारांच्या वेतनात घट होईल. लोकसंख्या आणि वेतननिधी या दोन्ही घटकात वाढ घडून आली तर यापैकी ज्या घटकातील वाढ अधिक प्रभावी असेल त्या घटकावर मजुरीचे निर्धारण होईल. वेतनाचा दर आणि श्रम पुरवठा यांच्यात जवळचे संबंध असतात. वेतनाच्या दरात वाढ झाली की श्रमाचा पुरवठा वाढतो. सर्वांना काम मिळणार नाही. काम मिळवण्याची स्पर्धा वाढेल. त्यामुळे मजुरीचे दर कमी होतील. मिल यांच्या मते, भांडवल वाढीच्या वेगापेक्षा लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असतो. त्यामुळे कामगारांच्या मजुरीचे दर घटतात. (कारण वेतननिधी हा भांडवलाचा काही भाग बाजूला काढून तयार केला जातो.) त्यामुळे कामगारांच्या राहणीमानाचा दर्जा खालावतो. ते होऊ नये म्हणून जन्मदरावर नियंत्रण ठेवले पाहिजे. म्हणजेच लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे. मिल यांच्या मते, गुंतवणूकीत वाढ झाली तर वेतननिर्धात वाढ होते. उपभोगात वाढ झाली की गुंतवणूकीत घट होते.

### (४) भांडवल संचयाचा दर ( Rate of Capital Accumulation) :—

भांडवल म्हणजे पूर्वीच्या (अगोदरच्या) कामगारांनी साठवलेल्या उत्पादनाचा साठा अशी भांडवलाची व्याख्या मिल यांनी केली आहे. आर्थिक विकास आणि भांडवल संचय या दोन घटकात जवळचे संबंध असतात. आर्थिक विकासासाठी भांडवल संचय आवश्यक असतो. भांडवल हा बचतीचा परिणाम आहे. म्हणजे बचतीतून भांडवलाची निर्मिती होते. भांडवल संचयाचा दर मोठा असेल तर वेतननिधीचा आकारही मोठा राहतो. आणि कामगारांची मागणीही मोठी राहते. जे. एस. मिल यांच्या मते भांडवल संचयाचा दर खालील दोन घटकावर अवलंबून असतो. (अ) वेतननिधीची रक्कम (ब) बचत करण्याची क्षमता, नफ्याचा दर आणि बचत करण्याची इच्छा (rate of profit and desire to save) या दोन घटकावर बचत करण्यासाठी क्षमता अवलंबून असते.

मिल यांच्या मते नफा हा श्रम खर्चावर अवलंबून असतो. (Profit depends upon cost of labour) मजुरीचे दर कमी झाले की उत्पादकांच्या नफ्यात वाढ होते. अशा प्रकारे नफ्यात वाढ झाली किंवा वेतन दरात घट झाली की भांडवल संचयाच्या दरात वाढ होते. भांडवल संचय हा लोकांच्या बचत करण्याच्या इच्छेवरही अवलंबून असतो. लोकांची बचत करण्याची इच्छा जास्त असेल तर बचत वाढून भांडवलनिर्मितीचा दरही वाढतो.

लोकांची बचत ही उद्योगातील निव्वळ उत्पादन वाढीवरही अवलंबून असते. निव्वळ उत्पादनात वाढ झाली की बचत वाढते. नफा आणि खंडात वाढ झाली की निव्वळ उत्पादनात वाढ होते. थोडक्यात भांडवल संचयात वाढ घडून येण्यासाठी भांडवलदारांच्या नफ्यात वाढ झाली पाहिजे. त्यासाठी त्यांनी अधिक नफा मिळवावा असे मिल यांनी म्हटले आहे. लोकांची बचत करण्याची क्षमता आणि बचत करण्याची इच्छा यात वाढ झाली की भांडवल संचयाचा वेग वाढतो. भांडवल संचयात वाढ झाली की देशाच्या आर्थिक विकासाचा दर वाढतो.

### (५) नफ्याचा दर (Rate of Profit)

मिल यांनी कोणत्याही अर्थव्यवस्थेत नफ्यात का घट घडून येते त्याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते (१) शेतीला लागू होणारा घटत्या उत्पादन फलाचा नियम आणि (२) माल्थसच्या दराने (भूमिती श्रेणीने) किंवा जास्त वेगाने वाढणारी लोकसंख्या यामुळे

अर्थव्यवस्थेत नफ्यात घट घडून येते. देशाच्या आर्थिक विकासासाठी भांडवल संचय आवश्यक असतो. आणि भांडवल संचयासाठी भांडवलदारांना नफा मिळाला पाहिजे. परंतु कालांतराने नफ्यात घट होऊ लागते . त्यामुळे बचत आणि भांडवल संचय यात घट होऊन आर्थिक विकासाचा वेग कमी होतो. (म्हणजे आर्थिक विकासावर मर्यादा पडतात) कृषी क्षेत्रातील तांत्रिक सुधारणांचा अभाव आणि भांडवल संचयातील वाढीच्या दरापेक्षा लोकसंख्या वृद्धीचा जास्त वेग यामुळे नफ्याचा दर किमान पातळीला पोहचतो. नफ्याचा दर किमान पातळीला आला की देश स्थितिशील अवस्थेला येऊन पोहचतो. असे असले तरी नफ्यात घट होण्याची प्रवृत्ती काही उपाय योजून रोखता येते. उदाहरणार्थ (१) तांत्रिक सुधारणा (Technical improvements) (२) परकीय व्यापाराचा विस्तार (The expansion of foreign trade) (३) अनुत्पादक खर्चासाठी सरकारी कर्जउभारणी (४) भांडवलाची निर्यात ( Capital exports) परंतु यापैकी कोणताही घटक निश्चितपणे कायम (सतत) राहणार नाही. त्यामुळे नफ्यात घट होण्याचीच प्रवृत्ती राहील. नफा किमान पातळीवर राहील. त्यामुळे भांडवल संचयाचा दर सुद्धा कमी होईल.

**(६) स्थैतिक अवस्था (स्थितिशील अवस्था) (The Stationary state) :–**

मिल यांनी आपल्या पुस्तकात स्थितिशील अवस्थेवर स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. मिल यांच्या मते, अर्थव्यवस्थेत कधीतरी स्थितीशील अवस्था येतेच. स्थितीशील अवस्था येणारच. फारतर काही वर्षासाठी ती पुढे ढकलली जाईल. पण कायमस्वरूपी स्थितीशील अवस्था टाळता येणार नाही. परंतु मिल यांनी स्थितिशील अवस्थेचे स्वागत केले आहे. त्यांच्या मते स्थितिशील अवस्थेमुळे उत्पन्न वितरणात सुधारणा होते आणि कामगारांना मिळणाऱ्या आर्थिक लाभात वाढ होते. या अवस्थेमुळे श्रमिकांना अधिक मोबदला मिळतो. म्हणून स्थितिशील अवस्थेचे मिल स्वागत करतात. चांगल्या सवयी आणि शिक्षण यांच्या साहाय्याने कामगारांनी आपल्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवले तरच हे फायदे मिळतील असे मिल यांनी म्हटले आहे. स्थितिशील अवस्था खूप आर्थिक विकास झाल्यानंतर येत असल्याने या अवस्थेला आरिष्ट (crisis) किंवा अनिष्ट मानू नये असे मिल म्हणतात. अर्थव्यवस्था, स्थितिशील अवस्थेत आली असली तरी समाजाचे बरीच प्रगती केलेली असते. आर्थिकेतर घटकांच्या साहाय्याने समाजाची प्रगती होऊ शकते. स्थितीशील अवस्थेत नफा जरी किमान पातळीला पोहचलेला असला तरी लोकांच्या राहणीमानाचा दर्जा कमी होत नाही. तो वाढलेलाच राहतो. कारण तांत्रिक प्रगतीमुळे लोक आरामदायी जीवन जगतात आणि लोकांनी आपल्या जीवन जगण्याच्या पद्धतीत केलेल्या सुधारणा यामुळे स्थितिशील अवस्थेतही चांगल्या राहणीमानाचे जीवन लोक जगू शकतात. (१) लोकांनी भरपूर संपत्ती मिळवलेली असल्याने अधिक संपत्ती मिळवण्याचा प्रयत्न लोक करत नाहीत. (२) श्रमिकांना चांगले वेतन मिळाले असल्याने त्यांची परिस्थिती सुधारलेली असते. (३) आर्थिक विवेचनेतून मुक्त होऊन जीवनाच्या इतर क्षेत्राकडे लक्ष देण्याऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असते. म्हणून मिल यांनी अशा स्थितीशील अवस्थेचे स्वागत आणि समर्थन केले आहे. स्थितिशील अवस्था ही कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत कधीतरी येतेच. ती काही वर्षे पुढे जाईल. पण कायम स्वरूपी टाळता येणारी ती बाब नसते असे मिल म्हणतात.

**(७) सरकारची भूमिका ( Role of The state ) :–**

जे. एस. मिल हे जरी निहर्स्तक्षेप धोरणाचे समर्थक होते तरी त्यांना देशाच्या आर्थिक विकासासाठी योग्य त्या ठिकाणी योग्य त्या प्रमाणात सरकारी हस्तक्षेपाचे समर्थन केले आहे. आर्थिक विकासातील सरकारच्या भूमिकेचे महत्व त्यांना पटले होते. तरीही अर्थव्यवस्थेत सरकारचा हस्तक्षेप किमान असावा असे त्यांचे मत होते. सरकारने व्यापाराशी संबंधित भ्रष्टाचाराच्या विरोधात कायदे करावेत आणि त्याची कडकपणे अंमलबजावणी करावी असे म्हटले आहे. सक्तीच्या शिक्षणाचा आणि सरकारी शिक्षणव्यवस्थेचा त्यांनी पुरस्कार केला होता. ग्राहक सुशिक्षित असावेत, अशिक्षित असू नयेत असे त्याचे मत होते. अशिक्षित ग्राहक हे वस्तूचे सक्षम ग्राहक बनू शकत नाहीत. म्हणून मिल यांनी सक्तीच्या शिक्षणावर आणि सरकारी शिक्षण पद्धतीवर भर दिला होता. मिल यांनी आर्थिक विकासासाठी पुढील बाबतीत सरकारने हस्तक्षेप करावा असे म्हटले आहे. (१) जी मालमत्ता किंवा संपत्ती वारसा हक्काने लोकांना मिळते त्यावर कमाल मर्यादा घालणे (२) कुळांचे मालकी हक्क (३) उत्पादन साधनांच्या मालकीचे वाटप इत्यादी बाबतीत सरकारने निर्णय घ्यावेत असे मिल म्हणतात. जे. एस. मिल हे मुक्त व्यापाराचे समर्थक होते. संरक्षक धोरणाचे विरोधक होते. मिल हे कामगार वर्गाचे कामाच्या तासाचे नियमन करण्याच्या बाजूचे होते.

**मिल यांच्या सिद्धांताचे टीकात्मक परीक्षण :—**

जे. एस. मिल यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतावर विविध अर्थतज्ज्ञांनी पुढीलप्रमाणे टीका केल्या आहेत. किंवा खालील कारणामुळे मिल यांचा सिद्धांत टीकेस पात्र ठरला आहे.

**(१) शेतीला घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम लागू पडत नाही :—**

जे. एस. मिल यांनी आपल्या सिद्धांतात घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम शेतीला लागू पडतो असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते, हे खरे नाही. शेतीला घटत्या सीमांत उत्पादकतेचा नियम लागू पडत नाही. तांत्रिक प्रगतीमुळे शेतीला हा नियम लागू पडत नाही. आधुनिक अर्थव्यवस्था असलेल्या विकसित देशात हा नियम लागू पडत नाही. कारण तांत्रिक प्रगतीमुळे उत्पादनात घट होण्याऐवजी वाढच होताना दिसते. अशा प्रकारे मिल यांनी गृहित धरलेले घटत्या सीमांत उत्पादकतेचे तत्व विकसित देशात तांत्रिक प्रगतीमुळे आढळत नाही.

**(२) निर्हस्तक्षेप धोरण चुकीचे :—**

मिल यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात निर्हस्तक्षेप धोरणाचे समर्थन केले आहे. ॲडम स्मिथ आणि रिकार्डो यांच्या प्रमाणे जे. एस. मिल हे सुद्धा निर्हस्तक्षेप धोरणाचे समर्थक होते. परंतु टीकाकारांच्या मते, देश जर लोकशाही किंवा भांडवलशाही असला तरी सरकारी हस्तक्षेप महत्वाचाच असतो. आर्थिक विकासात सरकारची भूमिका खूप महत्त्वाची असते. अविकसित आणि विकसनशील देशात आर्थिक विकासात सरकारची भूमिका खूप महत्त्वाची असते. परंतु त्याचा विचार मिल यांनी आपल्या सिद्धांतात केलेला नाही. रस्ते प्रकल्प, रेल्वे प्रकल्प, पाणीपुरवठा (सिंचन) प्रकल्प, आरोग्य क्षेत्र इत्यादी क्षेत्रात सरकारला पुढाकार घेऊन प्रचंड गुंतवणूक करावी लागते. त्याशिवाय गरीब देशात तर विकासाला सुरवातच होत नाही. आर्थिक विकासासाठी अर्थव्यवस्थेत सरकारचा कमीत कमी हस्तक्षेप असून भागत नाही. सरकारला अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात कार्य करावे लागते. त्याचा विचार मिल यांनी केलेला नाही.

**(३) माल्थस यांच्या सिद्धांताचे समर्थन चुकीचे :—**

मिल यांचा माल्थस यांच्या लोकसंख्या सिद्धांतावर विश्वास होता. त्यांनी या सिद्धांताचे समर्थन केले होते. परंतु टीकाकाराच्या मते, मिल यांनी माल्थस यांच्या लोकसंख्या

सिद्धांताचे अनावश्यक समर्थन केले आहे. माल्थस यांचा लोकसंख्या सिद्धांत पाश्चात्य विकसित देशांना लागू पडलेला नाही. इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, इटली आणि अमेरिका या देशांना माल्थस यांचा लोकसंख्या सिद्धांत लागू पडत नाही. विकसित देशात जन्मदर व मृत्यूदरात फारशी तफावत नसते. त्यामुळे अशा देशात लोकसंख्या वाढीचा प्रश्न नसतो. इटलीसारख्या काही देशात तर लोकसंख्या वाढण्याऐवजी कमी होत आहे. काही देश तर लोकसंख्या वाढीसाठी नागरिकांना प्रोत्साहन देत आहेत. मिल व माल्थस यांनी लोकसंख्या वाढीची जी चिंता केली आहे, ती विकसित देशांच्या बाबतीत खरी ठरलेली नाही.

**(४) वेतन निधीबाबतचे विचार चुकीचे :—**

जे. एस. मिल यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात वेतन निधीची संकल्पना मांडली आहे. ती संकल्पना चुकीची आहे अशी टीका टीकाकारांनी केली आहे. मिल यांच्या मते, वेतननिधी हा एकत्रित भांडवलावर अवलंबून असतो. आणि त्या वेतननिधीतून कामगारांना वेतन दिले जाते. त्यांच्या मते, कामगार संघटना वेतनात वाढ घडवून आणू शकतात. कॅनन, मार्शल यांनी मिल यांच्या वेतन निधीच्या कल्पनेवर मोठ्या टीका केल्या आहेत. कॅनन यांनी मिल यांची वेतन निधीची कल्पना ही मोठी घोडचूक आहे असे म्हटले आहे. ( According to Cannon, “It is the biggest blunder made in economic theory in modern times.”) मार्शल यांनी तर ‘the Vulgar form of the wage fund theory’ अशी मिल यांच्या वेतन निधीच्या कल्पनेवर टीका केली आहे.

**(५) स्थितिशील अवस्थेची कल्पना अवास्तव :—**

टीकाकारांच्या मते, जे.एस.मिल यांनी आपल्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात वर्णन केलेली स्थितिशील अवस्थेची कल्पना अवास्तव आहे आणि म्हणून चुकीची आहे. मिल म्हणतात. अर्थव्यवस्थेत नफा किमान पातळीला येतो. आणि अर्थव्यवस्था स्थैतिक अवस्थेला पोहचते. आर्थिक विकास पूर्ण झाल्यावर अर्थव्यवस्थेत स्थितिशील अवस्था येते आणि ही अवस्था टाळता येत नाही. केंव्हा ना केंव्हा ही अवस्था येणारच असे मिल यांनी म्हटले आहे आणि स्थितीशील अवस्थेचे त्यांनी स्वागत केले आहे. पण टीकाकारांच्या मते, मिल यांनी वर्णन केलेली स्थितिशील अवस्थेची कल्पना अवास्तव व चुकीची आहे. ही कल्पना प्रत्यक्षात वास्तवात कधीच आलेली नाही.

**(६) नवीन काहीच नाही :—**

काही टीकाकारांनी जे. एस. मिल यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात नवीन काहीच नाही असे म्हटले आहे. डेव्हिड रिकार्डो यांच्या आर्थिक विचारात काही सुधारणा करून त्यांनी आपले विचार मांडले आहेत अशी मिल यांच्यावर टीका केली आहे. मिल यांच्या आर्थिक विचारावर रिकार्डो, माल्थस आणि ॲडम स्मिथ यांच्या विचारांचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांतात फारसे काही नवीन नाही अशी टीका टीकाकरांनी केली आहे.

**सारांश**

जे.एस.मिल यांच्या सिद्धांतावर जरी वरीलप्रमाणे काही टीका केल्या जात असल्या तरी त्यांच्या आर्थिक विकासाचे सिद्धांताचे किंवा आर्थिक विकासासंबंधी मांडलेल्या आर्थिक विचारांचे महत्व कमी होत नाही. आर्थिक विकास कसा होतो? आर्थिक विकस केंव्हा व का थांबतो? आणि आर्थिक विकासासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत? हे जे.एस.मिल यांनी

अत्यंत प्रभावीपणे व तळमळीने मांडले आहे. त्यांच्या सिद्धांतातील काही आर्थिक विचार आजही उपयुक्त ठरतात. म्हणून मिल यांच्या सिद्धांतावर जरी काही टीका झाल्या असल्या तरी त्यांच्या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही.

**मिल यांचा सिद्धांत आणि अविकसित व विकसनशील देशांना लागू पडतो का?**

जे.एस.मिल यांचा आर्थिक विकासाचा सिद्धांत अविकसित आणि विकसनशील देशांना बऱ्याच बाबतीत लागू पडतो. आशिया, आफ्रिका खंडातील मागासलेल्या देशांना मिल यांचा सिद्धांत लागू पडतो. त्याचे स्पष्टीकरण किंवा कारणमीमांसा थोडक्यात खालीलप्रमाणे दिलेली आहे.

(१) अनेक अर्धविकसित देशात जमीन मर्यादित असते. तांत्रिक सुधारणा शेतीत खूपच कमी असतात. त्यामुळे कृषी उत्पादन वाढत नाही. अशा देशात शेतीला घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम लागू पडतो. मिल यांचे हे विचार अविकसित देशात खरे ठरतात. मिल यांनी शेतीची उत्पादकता वाढावी यासाठी अप्रगत देशांनी शेतीत तांत्रिक सुधारणा कराव्यात असे म्हटले आहे.

(२) भांडवल संचयात वाढ घडवून आणली तर आर्थिक विकासाचा दर वाढतो. हा मिल यांचा आर्थिक विचार अप्रगत देशांना अत्यंत उपयुक्त आहे. कारण अप्रगत देशातील भांडवल संचयाचा दर खूपच कमी असते. हा दर वाढावा यासाठी काही उपाय मिल यांनी आपल्या सिद्धांतात सांगितले आहेत. ते उपाय अविकसित देशांसाठी उपयुक्त आहेत.

(३) लोकसंख्यावाढ व आर्थिक विकास यांच्यातील संबंध मिल यांनी स्पष्ट केले आहेत. लोकसंख्या वाढ ही आर्थिक विकासात अडथळा ठरते हा मिल यांचा विचार अप्रगत देशात खरा ठरला आहे. भारतही त्याचा अनुभव घेत आहे. आर्थिक विकासासाठी लोकसंख्या वाढीच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे हा मिल यांचा विचार अप्रगत देशांना अत्यंत उपयुक्त आहे.

(४) आर्थिक विकासासाठी सरकारने किमान हस्तक्षेप करावा असा मिल यांचा विचार गरीब देशांना उपयुक्त आहे. कुळांना मालकी हक्क द्यावेत, नफ्यामध्ये कामगारांना वाटा द्यावा, उत्पादन साधनांचे पुर्नवाटप करावे, वारसा हक्क कायद्याने मिळणाऱ्या संपत्तीवर कमाल मर्यादा घालावी अशा सूचना मिल यांनी केल्या आहेत. त्या सूचना गरीब व विकसनशील देशांना उपयुक्त आहेत.

(५) मिल यांनी सक्तीच्या शिक्षणाची शिफारस केली आहे. ही शिफारस सुद्धा अप्रगत देशासाठी अत्यंत उपयुक्त आहे कारण आजही अनेक अप्रगत देशात २५ टक्क्यापेक्षा अधिक लोक निरक्षर आहेत. अशा निरक्षर उपभोक्त्यांचा आर्थिक विकासाच्या दृष्टीने उपयोग होत नाही. म्हणून शिक्षण सक्तीचे करावे असा मिल यांनी जो विचार मांडला आहे, तो अत्यंत महत्त्वाचा व मौल्यवान आहे हा विचार अप्रगत देशांना मार्गदर्शक आहे.

(६) मिल यांनी सरकारी शिक्षण व्यवस्थेची केलेली शिफारस सुद्धा अप्रगत देशांना उपयुक्त व मार्गदर्शक आहे. कारण खाजगी शिक्षण परवडत नाही. म्हणून देशातील निरक्षरता नष्ट करण्यासाठी, सर्वांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी खाजगी शिक्षण व्यवस्थेबरोबर सरकारी शिक्षणव्यवस्था सुद्धा असली पाहिजे हा मिल यांचा विचार गरीब व विकसनशील देशांना अत्यंत उपयुक्त आहे.

(७) कामगारांचे कामाचे तास कमी करावेत किंवा कामाच्या तासांचे नियमन करावे हा मिल यांनी मांडलेला विचार महत्वाचा आहे. कारण अनेक अप्रगत देशात कामगारांना जास्त वेळ काम करावे लागते. मिल यांचा हा विचार कामगार हिताचा आहे.